© 2025 IJNRD | Volume 10, Issue 8 August 2025 | ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# *स्वातंत्र्योत्तर काळातील लोकप्रिय कादंबरी*

**संशोधक- श्रीमती मोनाली राऊत**

'कांदबरी' हा साहित्य प्रकाराची "कथानक, व्यक्तीचित्रणं, लेखकाचा दृष्टीकोन, यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णन, वातावरण निर्मिती, शैली, इत्यादी घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कांदबरी होय."१ ( रा. ग. जाधव, मराठी विश्वकोश खंड -३ , संपादक, लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली, पृष्ठ क्रमांक : ६००) अशी जरी कांदबरीची एक व्याख्या केलेली असली तरी कांदबरी हि रंजनचं करते हे नाकारून चालणार नाही.

कादंबरीच्या लोकप्रियतेचा विचार करताना 'कांदबरी' या शब्दाचा अर्थ पाहणे गरजेचे आहे. "कादंबरी या शब्दाचा अर्थ आसव, मद्य असा होतो. मद्य हे हे जसे प्रत्यक्षाचा विसर पाडणारे आणि कदाचित आल्हाददायक असते तसे काहीसे कादंबरीचे स्वरुप असते, असे म्हणता येईल" असे कादंबरी बद्दल श्री. मा. कुलकर्णी यांनी मत मांडले आहे.२ (श्री. मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', प्रस्तावना पृष्ठ क्र.७, आवृत्ती १९७६, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २.पृष्ठ क्रमांक २) साहित्याच्या वाचनातून वाचकांच्या मनाला आनंद मिळतो. तसे शिक्षण होते, तसे त्यांच्या भावनिक व वैचारिक जाणिवा समृद्ध व्हायलाही मदत होत असते. प्राचीन काळातील समाज एकजिनसी असल्यामुळे वाचकांच्या अभिरुचीमध्ये फारसे वैविध्य असलेले दिसत नाही. त्यामुळे आधुनिक साहित्यात अभ्यासाच्या दृष्टीने आशयाच्या व उद्दिष्टांच्या अनुषंगाने प्रादेशिक, ग्रामीण, महानगरीय, दलित, स्त्रीवादी, विज्ञान साहित्य किंवा कलात्मक, लोकप्रिय असे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाल्याचे दिसतात. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर व इंग्रजी साहित्याच्या परिचयातून कथा, कादंबरी, कविता अशा आधुनिक वाङ्मय प्रकारातील साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागलेली दिसते. हे साहित्य रंजनपर व प्रबोधनात्मक उद्देशाने लिहिले जात होते. निव्वळ मनोरंजन करण्याच्या किंवा प्रबोधनाच्या उद्देशाने लिहिल्या जाणाऱ्या साहित्याचे वाचन करणे ही नवसाक्षर वर्गातील अनेकांची गरज बनली होती. केवळ करमणूक म्हणून वेळ घालवणे हाही वाचनामागे उद्देश होता. एकूणच स्वातंत्र्योत्तर काळात लोकप्रिय साहित्याने अमुलाग्र बदल स्वीकारलेले दिसून येतात. काळानुरूप निर्माण झालेले हे साहित्य वाचकांच्या अधिक पसंतीस उतरलेले दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात कादंबरीकार म्हणून स्थिरावलेल्या, लोकप्रिय झालेल्या, प्रतिष्ठित अशा फडके -खांडेकर -माडखोलकर इत्यादी लेखकांनी स्वातंत्र्योत्तर काळातही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. वाङ्मयाकडे आणि जीवनाकडे बघण्याचा जो दृष्टिकोण स्वीकारला आहे. तोच त्याच्या लेखनातून व्यक्त झाला आहे. या लेखकांचा एकूण मराठी लेखनावर आणि मराठी लेखकांवर पुढील काळात प्रभाव निर्माण झाला. या लेखकांच्या कादंबऱ्यांतून जीवनाविषयीचे सर्वसामान्य आणि ढोबळ तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. ना. सी. फडके यांच्या लेखनातून जीवन दर्शनापेक्षा मांडणीच्या तंत्राकडेच जादा लक्ष देण्यात आले होते. कादंबरी म्हटली की, कथानकाचे आकर्षकत्व हवे, स्वभाव दर्शनाची, संवादाची आणि वर्णनाची रंगत हवी, जिज्ञासा आणि विस्मय यांचा चतुर खेळ हवा, भाषेचा विलास हवा आणि निवेदनाचे चातुर्य हवे असे ना. सी. फडके यांनी आग्रहाने प्रतिपादित केले आणि स्वतःचे लेखनही त्यानुसार सिद्ध केले. वि. स. खांडेकर ना. सी. फडके यांच्या वाङ्मयातून या सामान्य वाचकाला ते सदैव लाभत राहिले आणि परिणामी दोघेही विलक्षण लोकप्रिय झाले. ना. सी. फडके यांची कादंबरी लेखन हेही प्रामुख्याने करमणूक प्रधानच होते. स्वातंत्र्योत्तर काळात गंभीर साहित्य आणि करमणूकप्रधान लोकप्रिय साहित्य यांच्यातले अंतर निर्णायक होत गेले. करमणूक ही

सर्वच समाजाची सर्व काळातील गरज असते. अशा कादंबऱ्यांचा प्रधान हेतू वाचकांचे रंजन करणे हा असल्याने ही 'वाचकनिष्ठा' डोळ्यांसमोर ठेवून त्यांचे लेखन केले जाते. चंद्रकांत काकोडकर बाबुराव अर्नाळकर यापासून ते शं. ना. नवरे, व. पु. काळे यांच्यापर्यंत याप्रकारचे लेखन केले. मध्यमवर्गीय वाचकांना अपरिचित असणारे शिकारीचे, गुन्ह्यांचे जग बाबा कदम यांनी आपल्या कादंबऱ्यांतून चित्रित केले असल्यामुळे ते अत्यंत लोकप्रिय झाले. व. पु. काळे यांच्या 'पार्टनर' सारख्या कादंबऱ्याही लोकप्रिय झाल्या आहेत. प्रेमकथा, रहस्यकथा, गूढकथा, गुन्हेगारी कथा, शृंगारकथा, अद्भुत कथा, विनोदी कथा इत्यादी विविध प्रकारचे कादंबरी लेखन या काळात झाले.

'एल्गार', 'हद्दपार', 'गारंबीचा बापू' या कादंबऱ्यांतून श्री. ना. पेंडसे यांनी हर्णेचा परिसर जिवंत केला. यातून स्वप्नरंजनपरता अनेक ठिकणी दिसून येते. स्वप्नरंजनता कादंबरीमध्ये चित्रित होत असताना ती कशा पद्धतीने होते हे श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' या कादंबरीच्या संदर्भात सांगता येईल. या कादंबरीबद्दल विवेचन करताना गो. मा. पवार म्हणतात, "गारंबीचा बापू या कादंबरीची निर्मिती दिवास्वप्नाच्या रंजक रूपांतरातून झाली. जीवनातील सामाजिक वास्तवाचे भान, चिंतनशीलता, जीवनाकडे बघण्याचा निश्चित दृष्टिकोन इ. चांगल्या कादंबरीकाराचे अपरिहार्य विशेष तिच्यात आढळून येत नाहीत. सगळ्या अंगांनी विचार करता तिचे स्वरूप मूलतः रंजकच आहे हे जाणवते. दुःखावर तोडगा म्हणून मंत्रसिद्ध ताईत व दोरे विकण्याचा, दिशाभूल करण्याचा उद्योग कुणीकुणी करतात. कलात्मक कादंबरीऐवजी मन रिझविणारी स्वप्नरंजनात्मक कादंबरी लिहून पेंडश्यांनी हा पारंपरिक उद्योगच केला आहे." ३.( गो. मा. पवार, मराठी साहित्य; प्रेरणा आणि प्रवाह संपादन : म. द. हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्रमांक . १६० ) स्वप्नरंजनता मांडत असताना त्यांनी वास्तवतेला कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्ग, व्यक्ती आणि गारंबी यांच्या परस्परसंबंधांचे चित्रण श्री. ना. पेंडसे यांनी अतिशय सामर्थ्याने केले.

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यातील लोकप्रिय साहित्याचा विचार करताना वा प्रवाहात भर घालणाऱ्या बहुसंख्य स्त्री कादंबरीकारांचा उल्लेख केला आहे. कोणत्याही प्रश्नांच्या मुळापर्यंत न जाता विविध विषयांवर गोष्टी लिहिण्याची वृत्ती त्यांच्या लेखनातून दिसून येते. विभावरी शिरूरकर यांनी 'बळी' ही कादंबरी लिहून स्त्री कादंबरीकाराचे सामर्थ्य मराठीमधे दाखवून दिले. स्त्री जीवनातील समस्यांचे चित्रण करणाऱ्या, स्त्री-मनाच्या व्यथा सांगणाऱ्या विभावरी शिरूरकर यांनी 'बळी' ही कादंबरी लिहिली आणि वाचकांचे लक्ष एका वेगळ्याच अनुभवविश्वाकडे वळवले. मांगगारूडी समाजाने सोसलेल्या दुःखाचे, त्यांच्यातील ओंगळपणाचे, त्यांच्या पशुपातळीवरच्या जीवनाचे दर्शन विभावरी शिरूरकर यांनी घडविले. दारिद्र्यात पार बुडालेली, गुन्हेगारीवर जगणारी, अंधश्रद्धा, निरक्षर, दिशाहीन जीवन जगणारी जमात 'बळी' मध्ये सजीव होते. ज्योत्स्ना देवधर यांनी 'घरगंगेच्या काठी' मध्ये एकत्र कुटुंबातील स्त्रीची कुचंबना आणि पुरुषी वर्चस्वाचे दर्शन घडवले. 'कल्याणी' आणि 'कुँवरनी' या त्यांच्या याच पद्धतीच्या कादंबऱ्या आहेत. निर्मला देशपांडे यांनी 'टिकली एवढं तळ' मधून स्त्री भाव चित्रित केला. सुशीला गोखले पटेल यांनी 'मृगजळातील नौका' मध्ये राजकीय महत्त्वाकांक्षेने झपाटून जाऊन कुठलेही विधिनिषेध न पाळणाऱ्या एका धूर्त, महत्त्वाकांक्षी आणि स्वार्थी पुरुषाच्या नादाने झालेली स्त्री ची फरफट दाखवली आणि पद्मिनीराजे पटवर्धन यांनी 'दीपशिखा' मध्ये राजघराण्यातील एका विवाहित स्त्रीच्या विवाहबाह्य प्रेमसंबंधांचे दर्शन घडवले. सुमती क्षेत्रमाडे यांनी 'आधार' मध्ये नर्सिंग व्यवसायातील स्त्रीचे दुःख आणि 'महाश्वेता' मध्ये कोड आलेल्या स्त्रीचे दुःख दाखवले आहे. शैला बेल्ले यांच्या 'झाड' मधे कर्नाटकातल्या मंगलूर कडील ग्रामीण भागातील एका निसर्गरम्य भागातल्या देवळाला केंद्रवर्ती करून सनातनी आणि कर्मठ जीवनाला छेद देणाऱ्या प्रेमभावनेचे प्रत्ययकारी दर्शन घडवले आहे. सुलोचना देशमुख यांनी 'आदिमाया', 'काचापाणी' आणि 'कामायनी' मधून स्त्री मनाचा शोध घेतला आहे. या कादंबऱ्यांच्या ठळकपणे येणाऱ्या मर्यादा असल्या तरी त्यांचा दृष्टिकोण निव्वळ रंजनवादी नाही तर गांभीर्याने घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात कादंबरी ही वेगळे भान, वेगळी संवेदना, नीती, आणि वेगळ्या जाणिवा व्यक्त करणारी आहे. पुढे तिचा विस्तार हा व्यापकतेने झाला आहे. हळूहळू या कादंबरीला स्वतंत्रपण, वेगळेपण लाभत गेले आणि काही नवी

वैशिष्ट्ये जाणवू लागली. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्वरूपाचे ठळक बदल होत होते आणि त्यातून एक वेगळे वातावरण निर्माण होऊ लागले होते. राष्ट्रीय आणि प्रादेशिक अस्मितेचा वेधही घेतला जाऊ लागला. एका बाजूला औद्योगीकरण आणि शहरीकरण वाढू लागले आणि त्यातून संपन्नतेच्या जोडीलाच बकाली जीवन, मूल्यशून्यता, भ्रमनिरास, संतप्तवृत्तीही वाढू लागल्या; दुसऱ्या बाजूने विशाल असे ग्रामीण जीवन नव्या प्रवाही जीवनाशी जोडले जाण्यातून समस्यामय बनू लागले, आजवर कधीही सामोरे न आलेले उपेक्षितवर्ग अभिमानाने पुढे येऊ लागले, समाजजीवनातली आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या सर्वच क्षेत्रातील ठराविक वर्गाची मिरासदारी संपुष्टात आली. या साऱ्या बरोबरच फ्राईड युंग अशा शास्त्रज्ञांनी ढळढळीत स्वरूपात पुढे आणलेले माणसाच्या अंतरंगातील जटिल गुंतागुंत दाखवणारे मनोविश्लेषणशास्त्रही आपल्या लेखकापर्यंत येऊन पोहोचले आणि त्याचा कळत न कळत परिणाम लेखनावरही होऊ लागला. एका बाजूला मानवी मनाची गहनगूढता लक्षात घेत असतानाच दुसऱ्या बाजूने मार्क्सवादी चिंतनाचा परिणाम म्हणून वर्ग संघर्षाचे भान आणि सामाजिक प्रतिबद्धता यांचीही दखल घेतली जाऊ लागली. आजवरची पांढरपेशी अभिरुची आता विस्तारू लागली आणि ग्रामीण आणि नागर अभिरुचीची समस्या निर्माण झाली. या साऱ्यांचा परिणाम मराठी कादंबरीवर झाला आणि त्यातून एक नवे रूपरंग सिद्ध झाले. मराठी कादंबरीतून नवी संवेदनशीलता प्रकट होऊ लागली. तिची कुतूहल क्षेत्रे बदलली. तसेच लेखनादर्श बदलले. वेगळी साध्ये तिला दिसू लागली हेच स्पष्ट होते.

कादंबरी मधून जीवनाबद्दलचे वाढते कुतूहल निर्माण झाले. एखाद्या विषयावर कादंबरी लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच कलात्मक आविष्कार करण्याकडे कल दिसतो. माणसाचे स्वतःशी, इतरांशी आणि निसर्गाशी असलेले संबंध अधिक नेटकेपणाने कादंबरीतून अवतरतात. जीवनातील गुंतागुंतीची, व्यामिश्रतेची जाणीव अधिक तीव्र झाल्याचे लक्षात येते. वासनाविकार, विध्वंस, रागलोभ, द्वेषप्रेम इत्यादीकडे हे लेखक अधिक धिटाईने बघत असून जीवनावर होणाऱ्या बऱ्या-वाईट परिणामांची दखल ते तितक्याच तीव्रतेने कादंबऱ्यांतून आविष्कृत करतात. लेखक आणि वाचक यांच्यातल्या संबंधाला आजवर फार महत्त्व होते, आता त्या ऐवजी लेखक आणि त्याचा अनुभव यांचा संबंध महत्त्वाचा मानला जाऊ लागला. एकाचवेळी या काळातली कादंबरी वर्तमानाला सामोरी जाणारी आणि त्याच्या बरोबर विरोधी अशा भूतकाळाकडेही झेपावणारी दिसते. मराठी कादंबरीचे अनुभवक्षेत्र या काळात खूपच विस्तारले आहे आणि अनेक नवीन विषय तिने हाताळले आहेत.

*संदर्भ सुची :*


१. रा. ग. जाधव, मराठी विश्वकोश खंड -३ , संपादक, लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली, पृष्ठ क्रमांक : ६००

२. श्री. मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', प्रस्तावना पृष्ठ क्र.७, आवृत्ती १९७६, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २.पृष्ठ क्रमांक : २

३. मराठी साहित्य; प्रेरणा आणि प्रवाह ( संपादन) : म.द. हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्रमांक . १६०

संदर्भ पुस्तक : प्रदक्षिणा खंड १ व २(संपा) : अनिरुद्ध कुलकर्णी , कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.